# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

RIGHT TO INFORMATION
जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१ ०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० फॅकस ०२२ २२०१८५३९
E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in

जा.क्र.राआ/महा./आस्था/बाहय. मनुष्यबळ/वाचा/दरपत्रक /२३/ 6904 दि - १४ जुलै, २०२३

## दरपत्रक सूचना

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई येथील मा.अध्यक्ष यांच्या वाहनाकरीता मासिक दरावर वाहनचालकांच्या सेवेची आवश्यकता आहे. त्यानुसार (संख्या -१) वाहनचालक पुरवठा करण्याबाबतचे दरपत्रक मागविण्यात येत आहे. मासिक दरावर वाहनचालक पुरविण्याबाबत दरपत्रकधारकांकडून लिफाफाबंद पध्दतीने दिनांक ०१/१०/२०२३ ते दि. ३०/०८/२०२४ या कालावधीकरिता दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदर दरपत्रकाच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | सेवेचा कालावधी | दि. ०१/१०/२०२३ ते दि. ३०/०८/२०२४ |
| २ | दरपत्रक स्विकारण्याचा कालावधी | दि. १७/०७/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. पासून |
| ३ | दरपत्रक स्विकारण्याची अंतिम तारिख व वेळ | दि. ३१/०७/२०२३ रोजी सायंकाळी ४.००वा. पर्यंत |
| ४ | बंद लिफाफे उघडण्याचा दिनांक | दि.०४/०८/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. राज्य ग्राहक आयोग, मुंबई या कार्यालयात |

**अटी व शर्ती ः-**

१. वाहनचालक भारतीय नागरीक असावा तसेच, त्यास मराठी लिहिता/वाचता/बोलता येणे आवश्यक राहील.

२. वाहनचालक महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा (अधिवास प्रमाणपत्र आवश्यक राहील)

३. वाहनचालकाचे वय २१ वर्षा पेक्षा कमी नसावे आणि ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४. वाहनचालक इयत्ता १० वी उत्तीर्ण असावा. (मराठी/हिंदी/इंग्रजी विषयासह)

५. वाहनचालकाकडे जड/हलके चारचाकी वाहन चालविण्याचा प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना मंजूर केलेले परवाना तसेच त्याचे ओळखपत्र आधारकार्ड/ निवडणूक ओळखपत्र/पॅन कार्ड यापैकी एक त्यांच्याकडे असावे. (आधारकार्ड असणे आवश्यक)

६. वाहनचालकास वाहन चालविण्याचा ३ वर्षाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र जोडावे.
७. संस्थेतर्फे पुरविण्यात येणारे वाहनचालक गुन्हेगारी पार्श्वभूमीचे/प्रवृत्तीचे नसावेत. त्याचे पोलीस पडताळणी अहवाल सादर करावा.
८. वाहनास अपघात होवून वाहनचालकास गंभीर स्वरुपाची इजा झाल्यास अथवा वाहनचालकास मृत्यु झाल्यास वाहनचालकास वैदयकीय खर्च अथवा नुकसान भरपाईचे इतर कोणतेही दायित्व शासनावर राहणार नाही.
९. वाहनचालकाने असभ्य वर्तणूक केल्यास तो वारंवार गैरहजर राहिल्यास अशा कर्मचा-याऐवजी अन्य कर्मचारी उपलब्ध करुन देणे संस्थेस बंधनकारक राहिल.
१०. वाहनचालकांच्या दिवसाचा कामकाजाचा कालावधी ९ तास राहील त्यानुसार त्याच्या वेतनाचा मासिक ठोक दर नमूद करावा.
११. वाहनचालकाच्या सेवा ९ तासापेक्षा जास्त झाल्यास, शासनाच्या प्रचलित दराप्रमाणे अतिकालीक भत्ता वाहनचालकास देय राहिल. (रु.४० प्रती तासापेक्षा जास्त नको)
१२. मुंबई/बृहन्मुंबई (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीच्या)बाहेर जावे लागल्यास वाहनचालकाच्या भत्त्याचा दर नमूद करावा. (प्रती दिन ३०० पेक्षा जास्त नको) तसेच रात्री १०.०० वा. नंतर थांबल्यास जेवण भत्ता (रु.१५० पेक्षा जास्त नको) व रात्री ११वा. नंतर थांबल्यास घरी जाण्याच्या प्रवास भत्त्याच्या दर नमूद करावा.
१३. आवश्यक असलेल्या वाहन चालकाच्या सेवा हया मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांच्या वाहनावर असल्याने वाहनचालकाचे वास्तव्य शक्यतोवर मुंबई क्षेत्रातील असावे.
१४. संबंधित वाहनचालकाच्या चुकीमुळे शासकीय वाहनाचे नुकसान झाल्यास सदरच्या नुकसानाची भरपाई करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
१५. वाहनचालकाची सेवा असमाधानकारक असल्यास सदर संस्थेस कोणतीही पूर्वसूचना न देता आपणाशी केलेला करार रद्द करण्यात येईल.
१६. ज्यावेळी वाहनचालकाची मागणी करण्यात येईल तेवढयाच कालावधीसाठी वाहनचालक पुरविणे बंधनकारक राहील.
१७. संस्थेची मागील ३ वर्षाची सरासरी उलाढाल रक्कम रुपये १० लाख असणे आवश्यक आहे. याकरीता मागील ३ वर्षाचे इन्कम टॅक्स रिटर्न जोडावीत.
१८. संस्थेने पॅन कार्ड, जी.एस.टी. प्रमाणपत्र व आवश्यक इतर परवाने सादर करावीत.

१९. वाहनचालकाची सेवा पुरविण्याबाबत रु. १००/- च्या स्टँप पेपरवर प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचे सोबत ११ महिन्यासाठी करार करणे आवश्यक राहिल.

२०. आस्थापना व दुकाने अधिनियमानुसार नोंदणी केलेल्या परवान्याची प्रत आवश्यक आहे.

२१. दरपत्रकदाराने जोडलेल्या दरांसोबत सर्व करांचा (जीएसटी करांसहित) समावेश करुन असावेत.

२२. दरपत्रकाच्या अटी व शर्तीसह राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या www.grahak.maharashtra.gov.in च्या website वर पाहण्यासाठी व डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहेत.

२३. दरपत्रकदारांना वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर सादर करणे संदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील दूरध्वनी क्रमांक संपर्क साधावा स.१०.०० ते ५.३० दूरध्वनी क्रमांक २२०५७४०९ व कार्यालयाचा पत्ता वरीलप्रमाणे आहे.

२४. सदर कामाचे दरपत्रक कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवलेले आहेत.

२५. वरील दरपत्रक सूचना कार्यालयाच्या www.grahak.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

२६. दरपत्रक सिलबंद लखोटे उघडण्याच्या दिवशी व वेळी दरपत्रकदारांनी उपस्थित राहणे क्रमप्राप्त आहे. दरपत्रकदार अनुपस्थित असल्यास उपरोक्त बाबींबाबत नंतर आक्षेप नोंदवता येणार नाही. अस्पष्ट कागदपत्र अपूरी कागदपत्रे किंवा सदोष कागदपत्रे घेतली जाणार नाही.

२७. दरपत्रक सादर केल्यानंतर चुका/गैरसमजुती इ. सारख्या कोणत्याही कारणास्तव दरांमध्ये कोणतेही बदल करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

२८. दरपत्रक मंजुरीनंतर दरपत्रकांनुसार ५ दिवसांच्या कालावधीत स्विकृत दरपत्रककाराने संमतीपत्र देणे आवश्यक राहील.

२९. दरपत्रकदाराने यापूर्वी शासकीय/निमशासकीय कार्यालय, संस्था अथवा कंपनी येथे वाहनचालक पुरविण्याचा अनुभव असावा व त्याबाबतचे कागदपत्रे सोबत जोडण्यात यावेत.

३०. यशस्वी दरपत्रकधारका सोबत करण्यात येणा-या करारामध्ये सदर अटी/शर्ती व सूचना यांचा समावेश असेल.

३१. सदर दरपत्रकासंदर्भात काही वाद उदभवल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र मुंबई शहर राहील.

३२. प्रत्येक दरपत्रकधारकाने काळया यादीतील कंत्राटदाराशी संबंध नाही त्याबाबत

लेखी नमूद करणे आवश्यक आहे.

३३. वाहनावरील वाहनचालक हा शासकीय कामाकाजाचे दिवशी, कार्यालयीन सुटटीच्या दिवशी तसेच मा.अध्यक्षांचे आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी सदरच्या संस्थेची राहील व या प्रकरणी कोणतीही दिरंगाई, गैरसोय इ. होणार नाही, याबाबत संबंधित संस्थेने योग्य ती दक्षता घ्यावी. तसेच मा.अध्यक्ष राज्य आयोग, मुंबई यांच्या मुंबई बाहेरील दौ-याकरीता देखील वाहनचालक उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

३४. शासनाला वाहनचालक पुरविण्यासाठीचा संस्थेकडे असलेला अनुभव व मागील तीन वर्षाची संस्थेची उलाढालासंबधी आकडेवारी दयावी.

३५. दरपत्रकातील दर स्विकृतीनंतर ते दर ११ महिन्यासाठी अस्तित्वात राहतील. सदर दर पुढील दर करार होईपर्यंत कायम राहतील. सदर करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा अथवा मुदतवाढ देण्याचा अधिकार मा.अध्यक्ष, राज्य आयोग, मुंबई यांना राहिल.

३६. कोणतीही दरपत्रक स्विकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीधारक यांनी राखून ठेवलेला आहे.

वरील अटी व शर्ती विचारात घेऊन मासिक दरावर वाहनचालक पुरविण्याबाबतचे दरपत्रक प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांच्या नावाने, **"राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र राज्य कार्यालय, जुने प्रशासकीय महाविदयालय, खोली क्र. १,२,५, व ६ हजारीमल सोमानी मार्ग, मुंबई ४०० ००१" दूरध्वनी २२०५७४०९** पत्त्यावर पाठविण्यात यावे किंवा प्रत्यक्ष आणून दयावेत.

प्राप्त दरपत्रक उघडण्याची तारीख, वेळ व www.grahak.maharashtra.gov.in या Webside वर उपलब्ध होईल. सदर माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी दरपत्रक उघडतेवेळी दरपत्रकधारक स्वतः किवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

14/07/2025

(रोहिणी सु. भोसले(नरसाळे))
प्र.प्रबंधक (प्रशासन)
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग
महाराष्ट्र, मुंबई